## नियमपुस्तिका तीन

### पर्यवेक्षणाचे मार्ग आणि जबाबदा-यांसह निर्णय घेण्याच्या प्रकियेमध्ये अनुसरलेली पध्दती

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हे वैधानिक लेखापरीक्षक आहेत आणि ते मुख्यत्वे करुन अर्थसंकल्प 'अ', 'ब' (निधी 11, 12, 21, 22, 23, 50, 60 आणि 70) खाली समाविष्ट असलेले महानगरपालिका निधी आणि अर्थसंकल्प 'इ' (निधी 30) खालील शिक्षण निधी, अर्थसंकल्प 'क' (निधी 40) खालील मुं.वि.पु.व प.उ.निधी आणि अर्थसंकल्प 'ग' खालील पाणी पुरवठा आणि मलनिःसारण निधी यांच्या छाननी व लेखापरीक्षणाकरिता जबाबदार आहेत. जनतेमार्फत केलेला कोणताही पत्र व्यवहार आणि त्याबाबत जो निर्णय घेण्यात येणार आहे तो निर्णय ज्या लेखापरीक्षकांनी प्रत्यक्षात काम केले आहे ते कक्षप्रमुख म्हणजे लेखापरीक्षा अधिकारी अशा लेखापरीक्षकांच्या पातळीवर चर्चिले जातात. घेतलेला निर्णय किंवा परिणाम तो लेखापरीक्षा विभाग प्रत्यक्षात ज्या विभागीय मुख्याच्या अधिन काम करीत असेल त्या परिमंडळ कार्यालयाच्या पुढे ठेवण्यात येतो आणि परिमंडळीय प्रभारी अधिकारी यांच्या पातळीवर तो निश्‍िचत केला जातो. घेतलेला निर्णय किंवा परिमाण हा जर धोरणात्मक असेल तर ती बाब म.न.पा. मुख्य लेखापरीक्षकांच्या समोर त्यांच्या मार्गदर्शनाकरिता आणि संमतीकरिता ठेवण्यात येते.

पर्यवेक्षणाचे मार्ग खालीलप्रमाणे आहेत

लेखापरीक्षणाचे क्षेत्रकार्य लेखापरीक्षकांच्या पातळीमार्फत म्हणजे वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक आणि कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक यांच्यामार्फत पार पाडले जाते ज्यांचे

लेखापरीक्षा अधिकारी

उपमुख्य लेखापरीक्षक

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक

हया हुदयांवरील अधिका-यांव्दारा पर्यवेक्षण केले जाते आणि त्यांची सर्व जबाबदारी कक्ष अधिकारी म्हणून म्हणजेच स्वाक्षरी करणारे अधिकारी जे कोणी असतील त्यांनी ते अखेरीस लेखापरीक्षा अवलोकन / निर्णय मान्य केला आहे त्यांच्यावर राहते.

**(श्री. मं.सि.गोसावी)**
जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे कार्यालय